**राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ % निधी थेट देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: पेसा २०१५/ प्रक्र.१९ / का-१७**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१६

<u>वाचा :</u>
१. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. पेसा २०१५/ प्र.क्र.१९/ का-१७, दिनांक २१ एप्रिल,२०१५
२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पेसाअ २०१५/ प्रक्र.९८/ का-१७, दिनांक २१.०८.२०१५.

## शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पेसा-२०१५ /प्र.क्र. १९/का.१७ **दिनांक २१ एप्रिल, २०१५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे** :-

१) शासन निर्णयाच्या परिच्छेद-१ मधील पृष्ठ क्र.२ वरील "मात्र उपरोक्त (ब) व (ड) येथील क्षेत्रामधील त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड ग्रामसभेने केल्यानंतर त्याकरिता लागणारा निधी ग्रामसभेची अनुमती घेऊन संबंधित गावांच्या संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्राम वन समिती किंवा सामुहिक वन हक्कांसाठी स्थापन केलेल्या समितीस देण्यात यावा" या ऐवजी "उपरोक्त (ब) व (ड) येथील क्षेत्रामधील त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड ग्रामसभेने केल्यानंतर त्याकरिता लागणारा निधी ग्रामसभेची अनुमती घेऊन संबंधित गावांच्या साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती (पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ) व सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती ( वनहक्क कायदद्याच्या अंमलबजावणीसाठी ) यांना देण्यात यावा" असे वाचावे.

२) शासन निर्णयाच्या पृष्ठ क्र.२ व ३ वरील परिच्छेद क्र.२ वगळण्यात येत आहे. तसेच शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील पृष्ठ क्र.११ वरील मुद्दा क्र. ९ वगळण्यात येत आहे.

३) शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.२ **ग्रामपंचायत स्तरावर निधीचे नियंत्रण व व्यवस्थापन** यातील अनुक्रमांक -९ वरील "ज्या ग्रामपंचायतीचे किंवा संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्रामवन समिती किंवा सामुहिक वनहक्कांसाठी स्थापन केलेल्या समितीचे" या ऐवजी "ज्या ग्रामपंचायतीचे किंवा साधन संपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती किंवा सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीचे" असे वाचावे.

४) शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.३ **निधीच्या विनियोगाचे सुत्र, कालमर्यादा** यातील अनुक्रमांक १ वरील "ग्रामपंचायतींना प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग खालील सुत्रानुसार करणे बंधनकारक राहील" या ऐवजी "ग्रामपचायतींना प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग शक्यतो खालील सुत्रानुसार करण्यात यावा" असे वाचावे. तसेच याच मुद्यांतील अ.क्र.२ व ३ वगळण्यात येत आहे.

२.  सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२२०१३२६०९९४२४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2016.02.20 13:28:31 +05'30'

**(प्रभाकर गावडे)**
उप सचिव,आदिवासी विकास

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई-३२
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. मंत्री/ राज्य मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री
५. सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर
८. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
९. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
१०. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
११. सचिव ( वने ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान मुख्य वन सरंक्षक, नागपूर
१३. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१४. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१६. विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/अमरावती व नागपूर
१७. जिल्हाधिकारी, ठाणे/ पालघर/ नाशिक/धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ नांदेड/ यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर
१८. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर /अमरावती/ नाशिक व ठाणे
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/ पालघर/ नाशिक/धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ नांदेड/ यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर
२०. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय
२१. सर्व संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२२. सर्व संबंधित गट शिक्षण अधिकारी
२३. सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२४. सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
२५. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
२६. वित्त विभाग, (व्यय १४ / अर्थ १९ )मंत्रालय, मुंबई -३२
२७. सर्व मंत्रालयीन विभाग
२८. सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३
२९. कक्ष अधिकारी, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई § ३२
३०. निवड नस्ती (का.१७)